# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:29.11.2024** **वारःशुक्रवार**

---

1) देशाच्या सुरक्षेबरोबरच सायबर युद्ध आणि दहशदवादाला तोंड देण्याच संरक्षण दलांसामोर आव्हान – राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यंच प्रतिपादन

2) पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या ओडिशा दौऱ्यावर

3) महाराष्ट्रातील सत्तास्थापनेबाबत महायुतीच्या प्रमुख नेत्यांची नवी दिल्लीत अमित शहा यांच्यासमवेत बैठक

4 ) ब्रिटनमध्ये स्थलांतरितांचा प्रश्न ऐरणीवर, वर्षभरात 9 लाखाहून अधिक नागरिकांचं स्थलांतर आणि

5 ) 55व्या इफ्फीचा गोव्यात दिमाखदार सोहळ्यात समारोप; लंपन या मराठी वेबसिरीजला आणि दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांना पुरस्कार

**राष्ट्रपती**

भारतीय सुरक्षा दलांवर केवळ देशाच्या सुरक्षेची जबाबदारी नसून सायबर युद्ध आणि दहशद वाद यासारखी नवी आव्हाने देखील असून त्यांना तोंड देण्यासाठी सक्षम होण आवश्यक आहे अस प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केल. तामिळनाडूतल्या वेलिंगटन इथल्या संरक्षण सेवा प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी अधिकारी आणि शिक्षकांना संबोधित करताना काल त्या बोलत होत्या.आजच्या जगात वेगाने बदलणाऱ्या भू- राजनैतिक वातावरणात सर्व प्रकारच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आपण तयार असले पाहिजे अस ही राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या. राष्ट्रपती मुर्मू बुधवारपासून तामिळनाडू राज्याच्या दौऱ्यावर असून आज त्या उधग मंडलम् अर्थात उटी इथल्या राजभवनात आदिवासी भागातील बचत गटाच्या महिला प्रतिनिधींना आणि निलगिरी जिल्ह्यातल्या आदिवासी समुदायाच्या प्रतिनिधींना भेटणार आहेत. उद्या तिरूवरूर इथल्या तामिळनाडू केंद्रीय विश्वविद्यालयाच्या दीक्षांत समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत .

**मोदी दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या ओडिशा दौऱ्यावर आहेत.भुवनेश्वर इथं होत असलेल्या पोलिस महासंचालक आणि पोलिस महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला ते उपस्थित राहणार आहेत.  ओडिशा प्रथमच या कार्यक्रमाचं आयोजन करत आहे.  सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलीस महासंचालक, तसंच केंद्रीय राखीव पोलिस बल, रॉ,   एनएसजी, गुप्तचर विभाग आणि एसपीजीचे प्रमुख या परिषदेला उपस्थित राहणार आहे. पंतप्रधान मोदींसह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे देखील या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत अंतर्गत सुरक्षा, सायबर क्राईम, माओवाद, एआय टूल्समुळे निर्माण होणारी आव्हानं, ड्रोनचे नवीन धोके आणि दहशतवादाचा सामना यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणारआहे.

**पंतप्रधान**

देशातल्या युवकांना सर्वोच्च स्थानावर पोहचण्यासाठी आणि आपल्या कारकिर्दीत उत्कृष्ट प्रदर्शन करण्यासाठी सर्व आवश्यक संधी  देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, अस  आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल आहे . माय जी ओ व्ही  हॅंडलवर त्यांनी हे आश्वासन दिल. भारतीय युवा शक्ति मध्ये कोणताही चमत्कार करण्याच सामर्थ्य आहे असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**सत्तास्थापना**

महाराष्ट्रातल्या सत्तास्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी काल रात्री मुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे, भाजपा नेते देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा देखील यावेळी उपस्थित होते. भाजपाचं वरिष्ठ नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा जो निर्णय घेतील, तो आम्हाला पूर्णपणे मान्य असेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आधीच स्पष्ट केलं आहे. दरम्यान राज्यातील विधानसभा निवडणुकीत अमित शहा यांनी दिलेलं पाठबळ आणि सहकार्याबद्दल भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. शहा यांनी पक्ष कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण केली; त्यांना प्रेरणा दिल्याचं फडणवीस यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**शहा**

गेल्या 10 वर्षांत देशातील दहशतवाद, डावी विचारसरणी, बंडखोरी आणि अंमली पदार्थ यांचा घातक परिणाम कमी करण्यात लक्षणीय यश मिळालं आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. मसुरी इथल्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीमध्ये  झालेल्या समारोप समारंभाला ते संबोधित करत होते.  “केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या ठोस धोरणांचे अपेक्षित

परिणाम झाले आहेत. 31 मार्च 2026 पर्यंत डाव्या विचारसरणीचा समूळ नायनाट केला जाईल," असं ते म्हणाले.  जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, डाव्या विचारसरणीचे अतिरेकी, ईशान्येकडील बंडखोरी आणि अंमली पदार्थ ही देशासमोरील चार प्रमुख आव्हाने आहेत. 150 वर्षे जुन्या ब्रिटीशकालीन कायद्यांच्या जागी तीन नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी केल्याने दोषी सिद्ध होण्याचे प्रमाण 90 टक्क्यांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, त्यामुळे देशाची न्यायव्यवस्था जगातील सर्वात आधुनिक व्यवस्था ठरेल, असंही शहा म्हणाले.

**ब्रिटन**

ब्रिटन मध्ये 2023 मध्ये उच्चांकी  9 लाख 6 हजार  परदेशी नागरिकांनी स्थलांतर केल असून ते 2022 पेक्षा जास्त असल्याच आढळून आल्याने, ब्रिटनच्या स्थलांतर धोरणामध्ये दुरुस्ती करून योग्य निर्णय घेतले जातील  अस ब्रिटनचे पंतप्रधान स्टीर कारमर यांनी जाहीर केल आहे .

ब्रिटनच्या राष्ट्रीय सांखिकी कार्यालयाच्या संशोधन अहवालानुसार  जून 2024 पर्यन्त ब्रिटन मध्ये सुमारे 12 लाख  स्थलांतरित नागरिक आले आणि 4 लाख 79 हजार  नागरिकांनी ब्रिटन देश सोडला . त्यामुळे स्थलांतरितांमध्ये प्रत्यक्षात  जून 2023 ते जून 2024  या वर्षात  20 टक्क्यांची घट झाली असून  ते 7 लाख 40 हजार आहेत . मात्र 2020 च्या  बेक्झिट  नंतर स्थलांतरितांचा  आणि सीमा सुरक्षेचा प्रश्न तिथ  ऐरणीवर आला असून ,यावर्षी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत या प्रश्नावरून कंजरवेटिव्ह  पक्षाचे  पंतप्रधान ऋषि सुनक यांच्या सरकारला पायउतार व्हाव लागल  होत  आणि स्थळांतरितांचा प्रश्न सोडवण्याच आश्वासन देणाऱ्या लेबर पार्टीला विजय मिळाला होता. लेबर  पार्टीचे सध्याचे  पंतप्रधान स्टीर कारमर  यांनी हा प्रश सोडवण्यात येईल आस आश्वासन दिल आहे .

**उत्तर प्रदेश चौकशी**

उत्तर प्रदेश सरकारनं संभलमधील हिंसाचाराच्या अलीकडच्या घटनेच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत. यामध्ये किमान चार जणांना प्राण गमवावे लागले आहेत. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश देवेंद्र कुमार अरोरा यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय समितीकडे  या प्रकरणाची चौकशी करण्याची करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या समितीचे इतर दोन सदस्य निवृत्त आयएएस अधिकारी अमित मोहन प्रसाद आणि माजी आयपीएस अधिकारी अरविंद कुमार जैन हे आहेत. या समितीनं दोन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उत्तर प्रदेशच्या गृहविभागानं काल ही समिती स्थापन करण्याचा आदेश जारी केला. या आदेशात म्हटलं आहे की, जामा मशीद विरुद्ध हरिहर मंदिर या वादात न्यायालयानं दिलेल्या सर्वेक्षणाच्या आदेशादरम्यान 24 नोव्हेंबर रोजी घडलेली हिंसाचाराची घटना पूर्वनियोजित कट होती की सामान्य गुन्हेगारी घटना होती याचा तपास करणे आवश्यक आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालय आज जिल्हा

न्यायालयाच्या 19 नोव्हेंबरच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करणार आहे. याच न्यायालयानं संभलमधील वादग्रस्त जागेचं सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ जामा मशिदीच्या व्यवस्थापन समितीने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करणार आहे. 19 नोव्हेंबरला दिवाणी न्यायालयाने दिलेल्या संभलच्या जामा मशिदीच सर्वेक्षण करण्याच्या आदेशानंतर या भागात तणाव वाढला असून , या मशिदीच्या जागेवर हरिहर मंदिर होत असा दावा हिंदू पक्षातर्फे करण्यात आला आहे.

**इफ्फी**

55 व्या अखिल भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थ इफ्फीचा समारोप काल गोव्यात एका दिमाखदार सोहळ्यात झाला. लंपन या मराठी वेबसिरीजनं उत्कृष्ट वेबसिरीजचा पुरस्कार पटकावला असून घरत गणपती या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांना भारतीय चित्रपटांच्या विभागात पदार्पणातील दिग्दर्शनाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. इफ्फितील मानाचा सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार ऑस्ट्रेलियन दिग्दर्शक फिलीप नॉईस यांना जाहीर झाला आहे. तर उत्कृष्ट चित्रपटाचा सुवर्णमयूर पुरस्कार सौले बिलुवाइट दिग्दर्शित टॉक्सिक या चित्रपटाला प्रदान करण्यात आला.

**हॉकी**

ओमानमधील मस्कत इथं काल झालेल्या पुरुषांच्या कनिष्ठ आशिया चषक 2024 हॉकी स्पर्धेत गतविजेत्या भारतानं जपानवर 3-2 अशा फरकानं विजय मिळवला. हा भारताचा पूल ए मधील सलग दुसरा विजय आहे. यापूर्वी भारतानं थायलंडविरुद्ध 11-0 असा जोरदार विजय मिळवला होता. कालच्या सामन्यात थॉकचोम किंग्सन सिंगने पेनल्टी कॉर्नर रिबाऊंड आणि त्यानंतर रोहित आणि अरिजीत सिंग हुंदल यांनी केलेल्या फटक्यांतून भारताचे गोल झाले. जपानच्या निओ सातोनं पेनल्टी कॉर्नरवरून दोन गोल करत त्यांना प्रत्युत्तर दिलं.

भारताचा पुढील सामना आज तैपेईशी होणार असून अंतिम सामन्यात रविवारी भारतीय संघाची गाठ कोरियाशी पडणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.